Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

10.

# प्राचीनवाड्मय आणि स्त्रीभ्रुणहत्या

प्रा. डॉ. अरविंदसोनटक्के
संशोधनमार्गदर्शक
दिगबररावविंदूमहाविद्यालय, भोकरजि. नांदेड.

**प्रस्तावना**

आज आधुनिक युगात नवतंत्रज्ञानाच्या साह्याने मुलीचा गर्भ काढण्याच्या सुविधेमुळे दोन महायुध्दातील जीवितहानी पेक्षा अधिक हानी या अजन्म मुलींची झालेली आहे. असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरणार नाही. आक्टोंबर २००३ मध्ये हैदराबाद मधील एका प्रसुतिगृहात नवजात मुलांची आदलाबदल झाल्याची तक्रार एक महिलेने केली होती. आपण मुलाला (पुत्राला) जन्म दिलेला असतांना आपल्याला दुसऱ्या कुणाची तरी मुलगी देवून आपला मुलगा नेला अशी तिची तक्रार होती. प्रत्यक्षात डी.एन.ए. तपासणी नंतर ती मुलगी तिचीच असल्याचे स्पष्ट झाले. यातून स्वत:च्या मुलीचा त्याग व इतराच्या मुलाचे संगोपन करण्यास ती का तयार झाली? ही निर्दयता का निर्माण झाली? या पाठीमागे केवळ 'मुलगाच हवा'हा संस्कार व सासर घरच्यांच्या अपेक्षेची दहशत कारणीभूत होती. यातून तिचे आईपण शुष्क झाले. ही केवळ एक घटना म्हणून पाहता येणारी गोष्ट नाही; तर याची पार्श्वभूमि वैदिक साहित्यात दिसते. ज्यातून आजचा भारतीय समाज मानस घडत गेला. साडेतीन हजार वर्षानंतरही स्त्री कडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलू शकला नाही. वैदिक वाड्मयातील स्त्रीया व आधूनिक स्त्रियात फार कांही बदल झालेला नाही. एकूणच स्त्रीभ्रुणहत्या हे केवळ एकाएकी निर्माण झालेले .खुळ नसून त्यासाठी प्राचीन परंपरा कारणीभूत आहेत ज्यांचा मागोवा घेणे हा या संशोधनाचा हेतू आहे.

ऋग्वेद (इ.स.पू. १५००) हा मानवी संस्कृतीच्या इतिहासातील विविध अंगाचा तपशिल मांडणारा महत्वाचा ग्रंथ आहे. यात शंकाच नाही. परंतु ऋग्वेदाने समाजाला काय दिले हा प्रश्न जेंव्हा निर्माण होता, तेंव्हा अनेक बाबी प्रकर्षाने जाणवतात. जसे अनेक ठिकाणी स्त्रीच्या संबंधाने अत्यंत अनुदार अशी भूमिका स्विकारलेली होती असे दिसते. भातृहिन स्त्री दुराचारी असते (ऋग्वेद ४/५/५). स्त्रीमन अनावर असून तिची बुध्दी चंचल असते (ऋग्वेद ८/३३/१७ ) तसेच स्त्रीरुपी असंग राजास इंद्र बेताने चालण्यास सांगतो व त्यासवर न पहाता अधोमुख रहा असेम हणतो. (ऋग्वेद ८/३३/१९). या संदर्भान्वये स्त्री वर्तनसंबंधी वचार व तिचे आयुष्य मर्यादित करण्याचा प्रयत्न दिसून येतो.

आर्य निर्विवादपणे पुरुषप्रधान होते. वैदिकवाड्मयात केवळ स्त्री निंदाच केली नाही तर तिचा वारसाहक्क देखिल नाकारलेला होता (ऋग्वेद ३/३१/२) . तो अधिकार केवळ पुत्रालाच असल्याचेम हटले आहे. पतीनिधनानंतरही तिला पतीच्या संपत्तीतही अधिकार नाकारला गेलेला होता (ऋग्वेद १/१२४/७ ). तैतिरीय संहिता (६/५/८/२) नुसार स्त्रीया शक्तिहीन असतात, त्यांना वारसाहक्क मिळत नाही. त्या दुष्टांपेक्षाही अधिक प्रमाणात निचभाष्य करतात. आचार्यचाणक्य ही बहिणींना वारसाहक्क नाही (३/६/५) म्हणतात. एवढेच नसून स्त्रीस व्यभिचारी ठरविण्यापर्यंत पुरुषप्रधानतेची मजल गेलेली दिसते (ऋग्वेद २/२९/१) जणुकांही पुरुष हा नैतिकतेचा पुतळा आहे. स्त्री दृष्टीकोण हा नकारात्मक निर्माण होण्यास वैदिक परंपरेतील साहित्यानेही भरटाकलेला दिसतो. शतपथब्राम्हणनुसार (१४/१/१/३१), 'स्त्री, शूद्र,कुत्रा आणि कावळ्यात असत्य, पाप व अंध:कार विराजमान असतो.' पूढील काळात निर्माण झालेल्या धर्मशास्त्र साहित्यात स्त्री दशा अधिकच दुर्बल होत गेली. गौतम (१८/१), वसिष्ठ धर्मसूत्र (५/१-३), मनु (५/१४६—१४८,९/२—३), बौध्दायन धर्मसूत्र (२/२/५०—५२), नारद (दायभाग,३१) या नुसार स्त्रीयांना स्वातंत्र्य असता कामा नये. नारदस्मृती (दायभाग, २८—३०) नुसार, 'विधात्याने स्त्रीस आश्रित बनविले आहे, उच्चकुळातील स्त्रियांना स्वतंत्र्य बहाल केल्यास त्याही अध:पातीत होतात. तसेच ऋग्वेदात (१०/९५/१५—१६) एके ठिकाणी

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

लांडग्याप्रमाणे कठोर ऱ्हदयी स्त्रियांचे साख्य हे साख्यच नव्हे. असे उद्वेगाने म्हटलेले आहे. एवढेच : नव्हेतर ऋग्वेदानुसार (१०/८५/३८–४०–४१) स्त्री उपवर होतांना व तद्नंतर तीला अनेकजन उपभोगीत असावेत असे दिसते. एकंदरीत समाजात स्त्रीची कन्या जन्मानंतर चांगले समजणे शक्यच नव्हते. त्यासाठी मुलाचाच म्हणजे पुत्रप्राप्तीचा हट्ट सहाजिकच निर्माण झाला असणार. ऐतरेय ब्राम्हणांत शुन:शेपत्याचा गुरु विश्वामित्र आणि आयोध्येचा इक्ष्वाकुवंशीय राजाहरिश्चंद्र यांच्या संबंधी कथा येते. ज्यामध्ये निपुत्रिक हरिश्चंद्राने पुत्रप्राप्तीसाठी वरुणाची उपासना केलेली आहे (ऋग्वेद ०१/२४). सावित्री (सत्यवान पत्नी) ही यमाला म्हणते, 'माझ्या अनपत्य वडिलांना १०० पुत्र होऊ दे.' तीस्वत: वडिलांचे अपत्य असतांना ती 'अनपत्य' असा उल्लेख करते (आ. ह. साळुंखे,महाभारतातील स्त्रीया,२००६ पृ.२५) याचा अर्थ पुत्रप्राप्तीच म्हणजे अपत्य प्राप्ती होय. कन्यारत्न झाल्यास सदरील व्यक्तिस अनपत्यच संबोधित असावेत.

ऋग्वेदातील एका ऋचेनुसार (१०/८५/३१) स्त्री पतीकडे रोग सवंमित करते. असा संदर्भ येतो. तसेच मुलगीही कष्टकारक असते आणि मुलगा हा सर्वोच स्वर्गातील ,प्रकाश आहे. असे ऐतरेय ब्राह्मणग्रंथात म्हटले आहे (७/१८). पुत्रहीन स्त्रीमध्ये निर्ऋती म्हणजे अवदसा वास्तव्य करीत असते (शतपथ ब्राह्मण, Kane, History of Dharmashastra,1992,voll.II) तैत्तिरीय (६/५/१०) आणि मैत्रायणीय संहिता (४/६/४) प्रमाणे, मुलगी जन्मली तर तिला बाजूला सारतात आणि मुलगा जन्मला तर त्याला उचलून घेतात. असा विचार ज्या समाजात आलेला असतो. तो समाजपुरुष आपल्या पत्नीने पुत्रालाच जन्म द्यावा ही इच्छा बाळगणाराच निर्माण होतो. या प्रभावातून मुलगाच हवा हा दुराग्रह स्त्रीमध्येही निर्माण व्हायला लागतो.

प्राचीनकाळी स्त्री विरोधात अनर्गल, निरर्थक, आधारहीन उक्तींना विरोध केवळ वराहमिहिरने (सहावे शतक) बृहत्संहितेत केलेला आहे. तसे कालिदास, भास, भवभूति या साहित्यकारांनी चांगले स्त्रीरुप प्रकटकेलेले आहे.

सारांश रुपाने असे म्हणता येईल की, प्राचीनकाळापासून स्त्रीस दुय्यम दर्जा दिल्याने कन्याजन्म नको ही मानसिकता दृढमूल होत गेली असावी. यापेक्षा आजही आदिवासी, कोल्हाटी समाजात मुलीचा जन्म आनंदाने साजरा केला जातो. तर आम्ही तथाकथित सुधारणावाद्यांना मुलगी जन्माला येणे हे वडिलांच्या डोक्यावर मोठे ओझे असल्यासारखे वाटते.

❑❑❑